**बंद आश्रमशाळांमुळे अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांचे समायोजन करुन शासकीय आश्रमशाळा व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये श्रेणीवाढ करुन माध्यमिकचे वर्ग सुरु करण्यास मान्यता देणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**आदिवासी विकास विभाग**

**शासन निर्णय, क्रमांक-शाआशा-२०१७/प्र.क्र. २६३/का.१३.**

**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**

**दिनाक - ५ फेब्रुवारी, २०१८.**

**<u>प्रस्तावना</u> :-**

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागातील सामाजिक/शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या आदिवासी जनतेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी क्षेत्र विकासाचा दृष्टीकोन स्वीकारण्यात आला आहे. आदिवासी क्षेत्राचा शैक्षणिक विकास होण्यासाठी आश्रमशाळा महत्वाचा केंद्र बिंदू आहे. त्यानुसार आदिवासी विद्यार्थ्यांना प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देण्याच्या दृष्टीने आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी विकास विभागांतर्गत ५५२ शासकीय आश्रमशाळा मंजूर आहेत. शासकीय आश्रमशाळांमध्ये सुमारे दोन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि. २१/०१/१९९९ नुसार आश्रमशाळा समुह क्षेत्र विकासाचा दृष्टीकोन, एकत्रिकरण व सुलभीकरण करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार आश्रमशाळा सुरु करण्यास मंजूरी देण्यात आलेल्या वर्षी इयत्ता १ ली व इयत्ता २ री चा वर्ग सुरु करण्यात येतो. तद्नंतर दरवर्षी पुढील वर्गवाढ (नैसर्गिक वाढीनुसार) करण्यात येते. अशा रितीने इयत्ता ७ वी पर्यंत पोहचलेल्या प्राथमिक आश्रमशाळांची पोस्ट बेसिक आश्रमशाळेत श्रेणीवाढ करुन तेथे इयत्ता ८ वी चा वर्ग सुरु करण्यात येतो, अशा रितीने माध्यमिक आश्रमशाळा १० वी पर्यंत पूर्णत्वास पोहचते. आश्रमशाळा योजनेंतर्गत गरज व परिसरातील शाळांमधील इयत्ता ७ वी व १० वी मधील विद्यार्थी संख्या लक्षात घेवून श्रेणीवाढ करण्यात येते. शासनाने काही आश्रमशाळा सुविधा व विद्यार्थीसंख्येअभावी बंद केलेल्या आहेत. तसेच काही शासकीय प्राथमिक आश्रमशाळा व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये श्रेणीवाढ करुन इयत्ता ८वी ते १०वी चे वर्ग सुरु करण्याची आवश्यकता आहे. सबब शाळा बंद केल्यामुळे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन करुन शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता ८वी ते १०वी वर्ग करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

आदिवासी विकास विभागाने शासकीय आश्रमशाळांचा वेळोवेळी आढावा घेऊन कमी विद्यार्थी संख्या असलेले वर्ग, तसेच मुलभूत सुविधा नसलेल्या शासकीय आश्रमशाळांचे जवळच्या आश्रमशाळांमध्ये वेळोवेळी समायोजन करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेस अनुसरुन आतापर्यंत प्रत्यक्षात खालीलप्रमाणे वर्गांचे/शाळांचे समायोजन झालेले आहे व काही शाळांच्या समायोजनांची कार्यवाही सुरु आहे. प्रत्यक्ष समायोजित झालेल्या वर्ग/शाळांचा अपर आयुक्त निहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | प्रकल्प | १ ली ते ४ थी वर्गाचे समायोजन | १ ली ते ७ वी वर्गाचे समायोजन | १ ली ते १० वी वर्गाचे समायोजन |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | २३ | ०२ | ०० |
| २ | नाशिक | १८ | ०६ | ०२ |
| ३ | अमरावती | ११ | २० | ०६ |
| ४ | नागपूर | २० | २६ | ०२ |
| | **एकूण** | **७२** | **५४** | **१०** |

२. शासकीय आश्रमशाळांच्या वरीलप्रमाणे केलेल्या समायोजनामुळे आतापर्यंत प्राप्त माहितीनुसार खालीलप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अतिरीक्त ठरलेले आहेत.

| अ.क्र. | पदनाम | एकूण अतिरिक्त पद |
|---|---|---|
| १ | माध्यमिक मुख्याध्यापक | १० |
| २ | प्राथमिक मुख्याध्यापक | १४ |
| ३ | माध्यमिक शिक्षक | ४१ |
| ४ | पदवीधर प्राथमिक शिक्षक | २१ |
| ५ | प्राथमिक शिक्षक | २५४ |
| ६ | कनिष्ठ लिपिक | ०५ |
| ७ | प्रयोगशाळा परिचर | ०६ |
| ८ | अधिक्षक | ४६ |
| ९ | अधिक्षिका | ४६ |
| १० | शिपाई | ०४ |
| ११ | स्वयंपाकी | ६२ |
| १२ | कामाठी | ५५ |
| १३ | पहारेकरी | २० |
| १४ | सफाईगार | १४ |
| | **एकूण (महाराष्ट्र राज्य)** | **५९८** |

**३.** शासकीय आश्रमशाळांच्या किंवा शाळेतील काही वर्गाच्या समायोजनामुळे अतिरिक्त् ठरलेल्या कर्मचाऱ्यांची उपरोक्त माहिती विचारात घेऊन, तसेच मेंढवण येथील आश्रमशाळेसाठी उपलब्ध् करुन दिलेली पदे विचारात घेतल्यास त्यातनंतर अतिरीक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांकडून खालीलप्रमाणे ७ इंग्रजी माध्यमाच्या शाळांना व २ शासकीय आश्रमशाळांमध्ये श्रेणीवाढ करण्यास मान्यता देण्यात यावी.

**<u>इंग्रजी माध्यमाच्या शाळा</u> :-**

| अ. क्र. | अपर आयुक्त | प्रकल्प | टिसपी/ ओटिएसपी | शासकीय प्राथमिक शाळेचे नांव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ठाणे | घोडेगांव | ओटिएसपी | इंग्रजी माध्यमाची आश्रमशाळा, घोडेगांव | आंबेगांव | पुणे |
| २ | | | ओटिएसपी | शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, मुथाळणे | जुन्नर | पुणे |
| ३ | | शहापूर | टिएसपी | शासकीय आश्रमशाळा, मढ | मुरबाड | ठाणे |
| ४ | | | टिएसपी | शासकीय आश्रमशाळा, दहागांव | शहापूर | ठाणे |
| ५ | | जव्हार | टिएसपी | शासकीय आश्रमशाळा, ओझर | जव्हार | पालघर |
| ६ | | | टिएसपी | शासकीय आश्रमशाळा, घानवळ | मोखाडा | पालघर |
| ७ | | | टिएसपी | शासकीय आश्रमशाळा, आमगांव | वाडा | पालघर |

**<u>शासकीय आश्रमशाळा</u> :-**

| अ. क्र. | अपर आयुक्त | प्रकल्प | टिसपी/ ओटिएसपी | शासकीय प्राथमिक शाळेचे नांव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ठाणे | जव्हार | टिएसपी | इंग्रजी माध्यमाची आश्रमशाळा, आमगांव | वाडा | पालघर |
| २ | | | टिएसपी | शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, घानवळ | मोखाडा | पालघर |

**४.** उपरोक्त परिच्छेद-३ मधील शाळांसाठी अतिरिक्त कर्मचाऱ्यांमधून पुढीलप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे उपलब्ध करुन देण्यांत येत आहेत.

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **एका शाळेसाठी मंजूर पदे** | **९ शाळांसाठी आवश्यक पदे** |
|---|---|---|---|
| १ | माध्यमिक मुख्याध्यापक | ०१ | ०९ |
| २ | माध्यमिक शिक्षक | ०४ | ३६ |
| ३ | कनिष्ठ लिपिक | ०१ | ०९ |
| ४ | प्रयोगशाळा परिचर | ०१ | ०९ |
| ५ | शिपाई | ०१ | ०९ |
| ६ | स्वयंपाकी | ०२ | १८ |
| ७ | कामाठी | ०२ | १८ |
| ८ | सफाई कामगार | ०१ | ०९ |
| | **एकूण :-** | **१३** | **११७** |

**५.** शासकीय आश्रमशाळा बंद केल्यामुळे किंवा शासकीय आश्रमशाळांमधील काही वर्गाचे समायोजन केल्याने अतिरिक्त् ठरलेल्या कर्मचाऱ्यांमधून श्रेणीवाढ केलेल्या उपरोक्त एकूण ९ आश्रमशाळांसाठी, इयत्ता ८वी ते १०वी चे वर्ग सुरु करण्यात येत असल्याने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यावर कोणताही अतिरिक्त् खर्च शासनावर येत नाही. तसेच बंद/समायोजित केलेल्या शाळांऐवजी सदरचे वर्ग सुरु करण्यात येत असल्याने विद्यार्थ्यावरही कोणताही अतिरिक्त् खर्च करण्यात येत नाही.

**६.** वरीलप्रमाणे केलेल्या ९ आश्रमशाळांसाठी श्रेणीवाढ करुन इ. ८वी व १०वी चे वर्ग सुरु करण्यासाठी समायोजनाने कर्मचारी उपलब्ध् करण्याबाबतचे आदेश आयुक्त्, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांनी काढावेत.

**७.** उपरोक्त आश्रमशाळेसाठी समायोजनाने दिलेल्या कर्मचारी व विद्यार्थ्यांवरील खर्च शासकीय आश्रमशाळांसाठीच्या व इंग्रजी माध्यमाच्या आश्रमशाळांसाठीच्या राज्य् व जिल्हा स्तरावरील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

**८.** सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०२०६१६०९५०४६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2018.02.06 16:13:49 +05'30'

**( सु. ना. शिंदे )**
**उप सचिव महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.४०० ०३२.
३. मा.मंत्री (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
४. सर्व मा. मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
६. सर्व मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. सर्व मा. विधानसभा सदस्य.
८. सर्व मा. विधानपरिषद सदस्य.
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. मा. सचिव, आदिवासी विकास, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
१३. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
१४. सर्व जिल्हाधिकारी.
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक
१६. अपर आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नागपूर / नाशिक/ ठाणे / अमरावती.
१७. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१८. महालेखापाल (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
१९. महालेखापाल (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
२०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२२. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२३. सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय.
२४. उप सचिव ( व्यय-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५. सर्व मुख्याध्यापक, शासकिय आश्रमशाळा
२६. निवडनस्ती (का-१३) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.

####